# पि. एम. महाजन, सदस्य (प्रशासकीय),महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, नागपूर यांचे न्यायालय.

प्रकरण क्रमांक (1):- REV/TNC/AMR-102/2018.

अर्जदार :- 1) **नाजूक गुणवंत सदांशिव,**
वय :- 60 वर्ष, व्यवसाय:- शेतकरी.
रा. लक्ष्मी नगर, संघमित्रा बुध्द विहाराजवळ, अमरावती.
ता. जि. अमरावती.

2) पदमाबाई w/o धर्मा वानखडे,
वय :- 55 वर्ष, व्यवसाय:- घरकाम.
रा. कविठा (बु.),
ता.:- चांदुर बाजार, जि. अमरावती.

3) श्रीमती कलावंताबाई प्रल्हाद सदांशिव,
वय :- 82 वर्ष, व्यवसाय:- घरकाम.

4) राजेश प्रल्हाद सदांशिव,
वय :- 40 वर्ष, व्यवसाय:- शेतकरी.

क्र. 3 आणि 4 रा. धामनगाव (गढी),
ता. अचलपूर, जि. अमरावती.

.../// विरूध्द ///...

गैर-अर्जदार :- 1) **परशराम औषधालय पब्लिक ट्रस्ट, परतवाडा,**
द्वारा ट्रस्टीज,

श्री. चंद्रशेखर चंपालाल @ श्री . विनय उघडे,
वय :- प्रौढ, व्यवसाय:- व्यापार,
रा. परतवाडा, ता. अचलपूर, जिल्हा:- अमरावती.

2) उपविभागीय अधिकारी, अचलपूर,
ता. अचलपूर जिल्हा:- अमरावती.

Mahajan

**अर्जदारकरीता** :- अधिवक्ता श्री. अभय सांबरे.
**गैर-अर्जदाररीता** :- अधिवक्ता श्रीमती. ईरा खिस्ती, श्री. पियुष राजूरकर

**प्रकरण क्रमांक (2) :- REV/TNC/AMR-103/2018.**

**अर्जदार** :-

1) **गोविंदा अती सदांशिव,**
वय :- 65 वर्ष, व्यवसाय:- शेतकरी.

2) निर्मला शामराव सदांशिव,
वय :- 55 वर्ष, व्यवसाय:- शेतकरी.

3) राहूल शामराव सदांशिव,
वय :- 30 वर्ष, व्यवसाय:- शेतकरी.

4) कु. अरुणा शामराव सदांशिव,
वय :- 20 वर्ष, व्यवसाय:- शेतकरी.

5) कुसूम रामदास थोरात,
वय :- वर्ष, व्यवसाय:- घरकाम.
C/o व्हि.आर. थोरात,
लालभटटी, सिंगल क्वॉर्टर्स झेंडा चौक,
पान शॉपजवळ, जबलपूर.

क्र. 1 ते 4 रा. धामनगाव (गढी),
ता. अचलपूर, जि. अमरावती.

**.../// विरूध्द ///...**

**गैर-अर्जदार :-**

1) **परशराम औषधालय पब्लिक ट्रस्ट, परतवाडा,**
द्वारा ट्रस्टीज,

श्री. चंद्रशेखर चंपालाल @ श्री . विनय रामेश्वर उघडे,
वय :- प्रौढ, व्यवसाय:- व्यापार,
रा. परतवाडा, ता. अचलपूर, जिल्हा:- अमरावती.

2) उपविभागीय अधिकारी, अचलपूर,
ता. अचलपूर जिल्हा:- अमरावती.

**अर्जदारकरीता** :- अधिवक्ता श्री. अभय सांबरे.
**गैर-अर्जदाररीता** :- अधिवक्ता श्रीमती. ईरा खिस्ती, श्री. पियुष राजूरकर, ॲड उत्कर्षा वैद्य.

**प्रकरण क्रमांक (3):- REV/TNC/AMR-24/2018.**

**अर्जदार** :- 1) **सुधाकर शिवराम लोंदे,**
वय :- 89 वर्ष, व्यवसाय:- शेतकरी.
रा. माळीपुरा, अचलपूर शहर,
ता. अचलपूर, जि. अमरावती.

1-a) शिवराम परसराम लोंदे (मयत),
1-b) भिमराव संपतराव भिंगारे (मयत),
1-c) अजाबराव भिमराव भिंगारे (मयत),
1-d) दादाराव अजाबराव भिंगारे (मयत),

2) गणेश भिमराव भिंगारे, वय :- प्रौढ,

3) रामदास अजाबराव भिंगारे,
4) नागोराव अजाबराव भिंगारे,
5) दिलीप अजाबराव भिंगारे,
क्र. 2 ते 5 रा. बेगमपूरा, अचलपूर शहर,
ता. अचलपूर, जि. अमरावती.

6) सौ. कमला वसंत कोकाटे,
रा. शिवदासनगर, At & Po. :- मुर्तीजापूर.

7) सुशीला मधुकरराव कोरडे,
रा. खरकाडीपूरा, At & Po. :- अमरावती.

8) कोकीळा अन्नासाहेब झोड,
रा. सावंगा, ता :- दर्यापूर. जि. अमरावती.

Vahajan

9) शोभा प्रल्हाद आटे,
रा. बालाजी नगर (कव्वामारी), परतवाडा,
ता :- अचलपूर. जि. अमरावती.

9-A) गुणवंताबाई अजाबराव भिंगारे (मयत),
क्र. 2 ते 5 रा. बेगमपूरा,
ता. अचलपूर, जि. अमरावती.

10) कुसूम कृष्णराव वाकोडे,
रा. गोपालनगर, अमरावती.

11) बेबीताई दिगंबर लंगोटे,
रा. खिरणी बगीचापूरा, अचलपूर शहर.

12) रजनी सुभाष काळे,
रा. शारदानगर, बडणेरा रोड, अमरावती, जि. :- अमरावती.

**.../// विरूध्द ///...**

**गैर-अर्जदार :-**

1) **परशराम औषधालय पब्लिक ट्रस्ट, परतवाडा,**
द्वारा ट्रस्टीज,
अध्यक्ष श्री. विनय रामेश्वर उघडे,
वय :- 55 वर्ष, व्यवसाय:- शेती आणि व्यापार,
रा. पिंपळकर मार्ग परतवाडा, ता. अचलपूर,
जिल्हा:- अमरावती.

2) सुरेश नारायणराव उघडे,

2-A) रामदास नारायणराव उघडे (मयत),
3) अनंत गणेश पिंपळकर,
4) भिकुलाल आर. गुप्ता,
5) अशोक छेदीलाल मिश्रा,

सर्व रा. C/o परशराम औषधालय पब्लीक ट्रस्ट,
पिंपळकर मार्ग, परतवाडा, ता. अचलपूर, जिल्हा:- अमरावती.

Mahajan

6) उपविभागीय अधिकारी, अचलपूर,
ता. अचलपूर जिल्हा:- अमरावती.

**अर्जदारकरीता** :- अधिवक्ता श्री. अभय सांबरे.
**गैर-अर्जदाररीता** :- अधिवक्ता श्रीमती. ईरा खिस्ती,

**प्रकरण क्रमांक (4):- REV/TNC/AMR-04/2019.**

**अर्जदार** :- 1) **शेख हुसेन शेख इमाम, (मयत)**

1-A) मोहम्म्द मुजाफर हुसेन, (Ret. Teacher)
रा. जमील कॉलनी, अमरावती,
ता. जि. :- अमरावती.

2) शेख रहमान शेख अमीर (मयत)
1-B) सैदा खातून हमीदुल्लाह
रा. मोबीनपूर, बु-हानपूर (M.P.)
2-A) अब्दुल मजीद शेख रेहमान, (मयत)
2-B) अब्दुल अजीज शेख रेहमान, (मयत)
3) खुर्शीद बेगम शेख रेहमान,
रा. बोरीपारा,अचलपूर शहर, ता. अचलपूर,
जिल्हा:- अमरावती.

**.../// विरूध्द ///...**

**गैर-अर्जदार** :- 1) **परशराम धर्मार्थ औषधालय पब्लिक ट्रस्ट, परतवाडा,**
द्वारा ट्रस्टीज,
श्री . चंद्रशेखर चंपालाल @ रामेश्वर नारायनदास उघडे,
वय :- 66 वर्ष, व्यवसाय:- शेती.
रा. परतवाडा, ता. अचलपूर, जिल्हा:- अमरावती.
1) विनयकुमार रामेश्वर उघडे
अध्यक्ष परशराम औषधालय पब्लीक ट्रस्ट
रा. परतवाडा, ता. अचलपूर, जिल्हा:- अमरावती.

2) सुरेश नारायण उघडे,

3) रमेश नारायण उघडे
4) अनंत गणेश पिंपळकर,
5) भिकुलाल रामदुलारे गुप्ता,
6) अशोक छेदीलाल मिश्रा,
7) दामोधर दत्तात्रय पटटलवार,
8) मधुकर गोविंद कानेटकर,
9) मनिष रामदास उघडे,
10) निलीमा पुरुषोत्तम हारोडे,
11) विजय हरीभाऊ जसवंत,

सर्व रा. परतवाडा, ता. अचलपूर, जिल्हा:- अमरावती.

क्र. 1,ते 5 रा. हनवतखेडा, ता. अचलपूर, जिल्हा:- अमरावती.
क्र. 6 रा. अंजनगाव सुर्जी, जिल्हा :- अमरावती.
क्र. 7 (a) & (b) रा. जसापूर,
ता. चांदुर बाजार, जिल्हा:- अमरावती.
क्र. 7 (c) रा. करजगाव, ता. चांदुर बाजार,
जिल्हा:- अमरावती.
क्र. 7 (d) रा. अचलपूर, जिल्हा:- अमरावती.
क्र. 8 रा. कांडली,
ता. अचलपूर, जिल्हा:- अमरावती.

**अर्जदारकरीता** :- अधिवक्ता श्री. डी. एम. सुरजुसे,
**गैर-अर्जदाररीता** :- अधिवक्ता श्रीमती. ईरा खिस्ती,

## आदेश

**(पारीत दिनांक:-15/12/2021)**

1. उपविभागीय अधिकारी, अचलपूर यांनी दिनांक 22/02/2018 रोजी पारीत केलेल्या महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेतजमीन (विदर्भ विभाग) अधिनियम-1958 चे कलम-120 (c) खाली परसराम ट्रस्ट यांनी अर्जदारांना ट्रस्टच्या जमीनीवर अनधिकृत वाहितीदार आहेत म्हणून काढून टाकण्यासाठी केलेल्या अर्जावर चार प्रकरणात स्वतंत्र आदेश दिनांक 22/02/2018 रोजी पारीत केलेले आहेत. सदर आदेशांचा आशय एकच आहे फक्त अर्जदारांकडे असलेल्या जमीनीचे क्षेत्र वेगवेगळे नमुद केलेले आहे. सदर दिनांक

22/02/2018 च्या चार आदेशांविरुध्द अर्जदार यांनी स्वतंत्रपणे चार रिव्हिजन अर्ज सदर कायद्याच्या कलम-111 खाली इच्छेस दाखल केलेले आहे. सदर अर्जदारांच्या नावाखाली त्यांच्या ताब्यात असलेले सर्वे नं. क्षेत्रफळ नमुद आहे. दोन्ही पक्षकारांना नोटीस तामील.त्यांचे म्हणणे मांडणेसाठी संधी देणेत आली.

1. प्र. क्र. :- REV/TNC/AMR-102/2018,
   नाजूक गुणवंत सदांशिव वइतर 3 –विरुध्द- परशराम औषधालय पब्लिक ट्रस्ट, परतवाडा, व 1 इतर,
   सर्वे नं. 259/1, गट नं.159, क्षेत्रफळ 3 हे. 43 आर. = 8 एकर+,
   मौजा धामनगाव गढी.

2. प्र. क्र. :- REV/TNC/AMR-103/2018,
   गोविंदा अती सदांशिव व 4 इतर–विरुध्द- परशराम औषधालय पब्लिक ट्रस्ट, परतवाडा, व 1 इतर,
   सर्वे नं. 250, गट नं.152 (270), क्षेत्रफळ 6 हे. 46 आर. = 16 एकर+,
   मौजा धामनगाव गढी, ता. अचलपूर.

3. प्र. क्र. :- REV/TNC/AMR-24/2018,
   सुधाकर शिवराम लोंदे व 16 इतर–विरुध्द- परशराम औषधालय पब्लिक ट्रस्ट, परतवाडा, व 6 इतर,
   सर्वे नं. 218, गट नं.152 (270), क्षेत्रफळ 11 हे. 09 आर. = 29 एकर+,
   मौजा खेलतपमाळी, ता. अचलपूर.

4. प्र. क्र. :- REV/TNC/AMR-04/2019,
   शेख हुसेन शेख इमाम वइतर 5 -विरुध्द -परशराम औषधालय पब्लिक ट्रस्ट, परतवाडा, व 11 इतर,
   सर्वे नं. 217, क्षेत्रफळ 8 हे. 44 आर. = 21 एकर+,
   मौजा खेलतपमाळी, ता. अचलपूर

**<u>अर्जदारांनी मांडलेल्या मुद्यांचा आशय येणेप्रमाणे:-</u>**

1. आमचे वडील/ आम्ही यांचा प्रतिवादी परसराम ट्रस्टच्या पदाधिकारी यांनी 1970 च्या आधीपासूनच कुळहक्काने वहिवाटीस दिली आहे.
2. आम्ही ट्रस्टला नियमीतपणे रेंट अदा केलेले आहे.

3. आम्ही कायदेशीररित्या सदर जमीन वहिवाट करीत आहोत.
4. प्रतीवादी ट्रस्ट कडे कधीही दवाखाना नाही, स्टाफ नाही
5. दवाखाण्याचे इमारत, कार्यालय सुध्दा नाही.
6. ट्रस्ट नावालाच आहे. औषध वाटप वगैरे सर्व खोटे आहे.
7. उघडे कुटूंबीयांची ही ज़मीन आहे. ट्रस्टच्या नावाचा केवळ आधार घेतलेला आहे.
8. प्रतिवादींकडे कुळकायदा कलम-129 (b) सुटीचे प्रमाणपत्र नाही.
9. सदर जमीनीवर आम्ही कुळवहिवाट करीत आहोत. आमचे वडील सुध्दा करीत होते त्यामुळे वारस म्हणून कुळ कायदा कलम-54 प्रमाणे आम्हास कुळाचे वारस म्हणून हक्क प्राप्त होतात
10. प्रतिवादी हे ओढून ताणून ट्रस्टची पंजीकृत नोंदणी, ट्रस्टच्या नावाखाली लोकानुमत दाखवण्यासाठी औषधोपचार, औषधांची वाटणी हा केवळ देखावा आहे. प्रत्यक्षात ते जनतेसाठी आरोग्यसेवेचे कोणतेही काम करीत नाहीत.
11. आम्हास यापूर्वी तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांनी कुळ म्हणून मान्यता दिलेली आहे. तसे आदेशही पारीत झालेले आहेत.
12. आम्ही कष्टकरी, शेतावर राबणारे शेतकरी आहोत. आमचा कायदे कानूनचा एवढा अभ्यास नाही. आमच्या अज्ञानाचा फायदा घेऊन प्रतिवादी आम्हास, अतिक्रमण, अनधिकृत वहिवाट ठरवून कायदेशीर हक्कापासून वंचीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत.
13. उपविभागीय अधिकारी यांचा दिनांक 22/02/2018 चा आदेश चुकीच्या माहितीवर आधारीत असून बेकायदेशीर व अन्यायकारक आहे तो रदद करणेत यावा.

**<u>प्रतिवादींचा युक्तीवाद येणेप्रमाणे:-</u>**

1. अर्जदार हे त्यांच्या वडीलांपासून ट्रस्टच्या जमीनीवर कुळ होते.
2. त्यांचे वडीलांवर सदर जमीन ते वाहीती करीत आहेत.
3. वादातीत जमीन ही ट्रस्टच्या मालकीची आहे हे अर्जदारांना मान्य आहे.
4. प्रतिवादी म्हणजे आमचेकडे मध्यप्रदेश रजिष्ट्रेशन क्रमांक 382/195 तसेच मुंबई पब्लिक ट्रस्ट अॅक्ट खाली E-18, दिनांक 21/07/1968 चे रजिष्ट्रेशन आहे.
5. कनिष्ठ न्यायालयांनी योग्य निष्कर्ष काढलेला आहे की, आम्ही चॅरीटी पर्पज साठी तसेच आरोग्य सेवांसाठी सर्व खर्च करतो. उपविभागीय अधिकारी यांनी यापूर्वी दिलेले याबाबतचे आदेशांना अर्जदारांनी कधीही आव्हान दिलेले नाही.

Sahajan

6. या आधीच्या आदेशांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी नमूद कलेले आहेत. आमचा ट्रस्ट हा 129 (b) खाली सुटीसाठी पात्र आहे.
7. हे स्पष्ट आहे की आमचा ट्रस्ट हा पंजीकृत आहे. व कलम- 129 (b) खाली सुट मिळण्यास पात्र आहे.
8. मा. हायकोर्ट रिट पिटीशन क्रमांक 7620/2012 श्रीराम गोरक्षण संस्था विरुध्द ओमप्रकाश पोटे निर्णय दिनांक 26/11/2013 निर्णयात स्पष्ट केले आहे. उपलब्ध पुरावे पक्षकारांकडे असतील तर 129 (b) सुटीच्या दाखल्याची सुध्दा गरज नाही.
9. मा. हायकोर्ट रिट पिटीशन क्रमांक 4911/2014 श्री दिगंबर जैन धर्म संस्था विरुध्द उपविभागीय अधिकारी निर्णय दिनांक 23/02/2016 यात नमुद केले आहे की, ट्रस्ट हा सुटीस पात्र आहे हे एकदा मान्य झाले की, दिनांक 01/04/1961 या टिलर्स डे रोजी कुळ असलेल्या लोकांच्या वारसांना कुळ वहिवाट दाद म्हणून हक्क प्राप्त होऊ शकत नाहीत आणि त्यांना कुळवहिवाट कलम-120 खालीही सरंक्षण मिळू शकत नाही.
10. अर्जदार हे मुळ कुळांचे वारस आहेत हे सिध्द झालेले आहे. त्यामुळे कलम-129 (b) प्रमाणे तसेच उपरोक्त निर्णयाप्रमाणे सुध्दा त्यांचा वादातीत जमीनीवरील ताबा हा अवैध असल्यामुळे त्यांना निष्काषीत करण्याचा उपविभागीय अधिकारी यांचा आव्हानीत आदेश कायम करणेत यावेत.

दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद, कनिष्ठ न्यायालयांचे अभिलेख, सायटेशन्स, उपलब्ध् कागदपत्रे कायद्यातील तरतुदी यांचा अभ्यास करता मी पुढील प्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

**निष्कर्ष :-**

1. अर्जदारांचे वडील हे वादातील जमीनीवर कुळ म्हणून वहिवाट करीत होते हे प्रतिवादी तसेच कनिष्ठ न्यायालयांनाही मान्य आहे.
2. ट्रस्टला सार्वजनीक संस्थेत कलम-129 (b) खाली प्रमाणपत्र देणेआधी कुळ कायदा कलम- -129 (b) खाली जिल्हाधिकारी यांनी अशी चौकशी करावी हे नमुद आहे. 129 (b) खाली चौकशी अतिषय जबाबदारीची वैधानिक कामकाज आहे.
3. 129 (b) खाली काहीही चौकशी केली नसतांना उपविभागीय अधिकारी यांनी प्रकरणातील जमीनीबाबत ट्रस्ट हा 129 (b) खाली सुटीस पात्र आहे असे मत

Vahajan

नोंदविल्याचे अर्जदार त्यांचे युक्तीवादात प्रतिपादन करतात याला कायदेशीर काहीही आधार नाही.

4. ट्रस्ट हा लोकोपयोगी खरोखर योग्य खर्च करीत आहे याचे योग्य पुरावे असतील तरच 129 (b) खाली सुटीच्या सर्टिफीकेटची गरज नाही असे मा. हायकोर्ट निर्णय रिटपिटीशन 4620/2012 दिनांक 26/11/2013 च्या निर्णयात आहे. सदर निर्णयाचा केवळ Theoretical सैध्दांतीक, कपोलकल्पीत आधार अर्जदारास घेता येणार नाही. मा. हायकोर्टाच्या निर्णयात अपेक्षीत ट्रस्टचे कर्तव्य हवे.
5. ट्रस्टकडे दवाखाना, औषधालय वैद्यकीय सेवा पुरविणे याबाबत काहीही पुरावे दिसून येत नाहीत. बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी याप्रमाणे ट्रस्टचे म्हणणे दिसून येते.
6. कनिष्ठ न्यायालयांनी सदर ट्रस्ट सुटीस पात्र आहे असे काही मत नोदविण्याआधी त्यांची संवैधानीक जबाबदारी ओळखून मत नोंदविणे आवश्यक आहे.
7. जर ट्रस्ट खरोखर लोकहितार्थ, लोकोपयोगी, परोपकारी कामे करीत होता तर मग त्यांना सुटीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज करण्यास कोणी प्रत्यवाय केला होता हे ही कळून येत नाही.
8. कष्टकरी वहिवाटदारांना त्यांना हक्कांपासून वंचीत ठेवण्यासाठी 120 (क) खालील अधिकार वापरणे संयुक्तीक नाही.

सबब पुढील प्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

1. अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
2. उपविभागीय अधिकारी यांचा दिनांक 22/02/2018 चा आदेश रदद करण्यात येत आहे.
3. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

Mahajan
16.12.21

पी. एम. महाजन,
सदस्य (प्रशासकीय),
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण,
नागपूर